पारावरच्या गप्पा

# पिकासाठी पाण्याचा वापर नियंत्रित असावा !



देवदर्शन आटोपून गणपत पारावर बसला होता, अर्थातच संपतची वाट पाहत. संपतने देवदर्शन आटोपले व गणपतजवळ येत तो म्हणाला, ''काय गंपा, निवांत दिसतोय, आज काय कामाचे नियोजन दिसत नाही ?''

त्यावर हसत गणपत म्हणाला, ''काही पण काय बोलतो रे संपा, आपण आणि निवांत, हे कसं शक्य आहे ? अर्थात आपल्या कामाचे नियोजन हे आपल्या हातात नसते. जेव्हा आपल्या कामाचा मूड असतो तेव्हा काम करायला संधी मिळत नाही आणि जेव्हा खूप कंटाळा येतो त्यावेळी मात्र फार काम असतं.''

गणपतचं कोड्यातील बोलणं संपतला काही कळलं नाही. तो म्हणाला, ''आरं गंपा, तुला नेमकं काय म्हणायचं आहे ? आता सकाळी सकाळी तुझा काम करायचा मूड नाही– की कोणी अडवलं आहे तुला ?''

हसत गणपत म्हणाला, ''हे बघ संपा, आता सकाळी सकाळी पिकाला पाणी द्यावं तर लाईट येते ११ वाजता. दुपारी आराम करावा तर दुपारी लाईट असते. आता हे झालं या आठवड्याचं. पुढच्या आठवड्यात तर मात्र फारच हाल. रात्री १० वाजता लाईट येणार आणि ती चालणार सकाळी ६ वाजेपर्यंत. मग झालं की नाही झोपेचं खोबरं! बरं दिवसा पाणी भरून घ्यावं तर लाईट टिकत नाही. रात्री पाणी भरावं तर ही मरणाची थंडी, वरून बिबट्याची भीती. साप, विंचू या प्राण्यांचा त्रास तर विचारूच नको. आता हे झालं लाईट आणि पाणी भरण्याबद्दल, काम करायची ज्यावेळी गरज असते त्यावेळी मजूर मिळत नाहीत. महाग मजूर घेऊन नुकसान तर होतंच; परंतु केलेल्या नियोजनानुसार काम न झाल्यामुळे होणारा मनस्ताप वेगळा. म्हणून म्हणतो, कसलं डोंबल्याचं नियोजन आणि नियोजनबद्ध– काटेकोर शेती, तसंच कसलं उत्पादनवाढ तंत्रज्ञान! मागील आठवड्यात म्हटलं पिकाला युरिया द्यावा तर युरियाच शिल्लक नाही. चढ्या भावाने घ्यायचा युरिया किंवा दुसऱ्या खताबरोबर युरिया मिळत होता! म्हणजे झालं का मनासारखं ?''

अर्थात हेच प्रश्न संपतलाही भेडसावत होते; परंतु बदलत्या परिस्थितीवर संपतने त्याच्या शेती व्यवसायात बदल करून घेतले होते. म्हणून तो म्हणाला, ''हे बघ गंपा, प्रश्नावर उत्तर शोधण्याऐवजी निव्वळ रडत राहण्यात काहीच मजा नाही बघ. शेतीसाठी विजेचा प्रश्न आजचा आहे काय ? पिकाला

पाणी देण्याचा प्रश्न आजचा आहे काय? अनेकदा विहिरीत पाणी आहे तर लाईट नाही आणि लाईट आहे तर पाणी नाही, ही समस्या आपल्या पिढीने चांगलीच अनुभवली आहे! मग यात बदल तर केलाच पाहिजे. तुला अनेकदा सांगितले की, पिकाला पाणी देण्यासाठी ठिबक बसवून घे म्हणून. ठिबक असलं म्हणजे जेव्हा केव्हा लाईट येईल तेव्हा मोटार चालू होऊन पिकाला पाणी देता येईलच ना?''

यावर हसत गणपत म्हणाला, ''वा रं संपा. म्हणजे माझ्या विहिरीला भरपूर पाणी आहे, मलाही पाणी देण्यासाठी वेळ आहे, मग कशाला ठिबक करण्यासाठी खर्च करत बसू? एक तर ठिबकने सर्व ठिकाणी सारखं पाणी बसत नाही, वरचेवर पाणी द्यावं लागतं. अनेकदा तर ठिबक चालूनही जमीन पाहिजे तशी ओली होत नाही. वर परत पीक गेलं की काढा ठिबक. नवीन पीक केल्यावर परत पसरवा नळ्या! हे उद्योग करण्यापेक्षा मस्त मोटार चालू केली, पाणी लावलं, पिकाला चांगलं पाणी भरून झालं की परत १५-२० दिवस काही त्रास नाही.'' खरं तर गणपतच्या या ठिबकने पाणी देण्याच्या गैरसमजुतीबद्दल संपतला गणपतची कीवच आली व रागही आला.

तो गणपतला म्हणाला, ''आरं गंपा, आता थोडा तरी बदल... जग पुढे जात असताना तू अजूनही जुन्याच विचारसरणीत का अडकला आहेस हेच मला कळत नाही. ठिबकने पाणी देण्याबद्दल तू जे काही सांगितलेय ते तुझे अज्ञान आहे. एकतर तू म्हणतो तुझ्याकडे भरपूर पाणी आहे म्हणून ठिबकची गरज नाही. उलट मी म्हणतो तुझ्याकडे जास्त पाणी आहे म्हणूनच तुला ठिबकची गरज आहे. कारण ज्याच्याकडे कमी पाणी आहे तो काटकसरीने पाण्याचा वापर करतो. त्यामुळे त्याची जमीन चांगली राहते. तू मात्र जास्त पाणी असल्यामुळे भरपूर पाणी जमिनीत सोडतो, यामुळे काय होते हे तुलाच कळत नाही. एक तर जास्त पाणी दिल्यामुळे तुझ्या जमिनीत वापसा येण्यास फार वेळ लागतो. जमिनीमध्ये जोपर्यंत ५० टक्के हवा, ५० टक्के पाणी असे प्रमाण तयार होत नाही तोपर्यंत पिकाच्या मुळांना पाणी शोषून घेता येत नाही. आता तू जमिनीला पाण्यात बुडवून ठेवल्यामुळे तेथे हवा 'झिरो' होते! ५० टक्के हवा येण्यासाठी ४-५ दिवस लागतात, तोपर्यंत पीक हवेवाचून उपाशी राहते. जास्त पाण्यामुळे जमिनीतील जीवजिवाणू, गांडुळे कमी होतात. पाण्यामध्ये क्षार असतात, जेवढे जास्त पाणी देशील तेवढे तुझ्या जमिनीत क्षार वाढत जातील, म्हणजे तुझी जमीन क्षारवट- चोपण होत जाईल. ही बाब आपल्या लगेच लक्षात येत नाही. परंतु हळूहळू आपली जमीन चिवट, कडक होत जाते. ज्यामध्ये पिकांच्या मुळांची चांगली वाढ होत नाही आणि उत्पादनात घट येते. पाणी दिल्यानंतर १०-१५ दिवसांनी जमिनीतील हवेचे प्रमाण वाढत जाते आणि पाणी कमी होत जाते. जमिनीला भेगा पडतात. अशावेळी पिकांच्या मुळ्या तुटतात. त्या पाण्याचे शोषण करू शकत नाहीत. परत एकदा पिके पाण्यावाचून उपाशी राहतात. म्हणजेच पिकाला २० दिवसांनी पाणी दिले तर पहिले पाच दिवस आणि शेवटचे पाच दिवस पिकाला पाणी मिळत नाही. म्हणजेच पिकाच्या वाढीच्या कालावधीतीत ५० टक्के कालावधीत पीक पाण्यावाचून उपाशी राहते. म्हणून पिकाचे उत्पादन कमी येते. तिसरे महत्त्वाचे सांगतो, पीक गेल्यानंतर ठिबकच्या नळ्या गोळा करणे आणि परत नळ्या पसरणे हे काम वर्षातून एकदा किंवा दोनदाच करावे लागते. तेही जेव्हा तुझा मूड असतो तेव्हाच नळ्या गोळा कर. वर्षातून फक्त एक- दोनदाचं काम आहे ते.''

संपतच्या बोलण्यामुळे गणपत थोडा सावरून बसला आणि म्हणाला, ''ठीक आहे रे संपा, पण एवढे पैसे आणायचे कोठून? एवढे पैसे खर्च करून परवडतं का ठिबक करायला? आता तुझ्याकडे पैसा आहे म्हणून तू केली सर्व पिकांना ठिबक सिंचन! पण सर्वसामान्य शेतकऱ्यांनी करायचं काय?''

यावर संपत हसून म्हणाला, ''गंपा, तुझं कसं आहे माहीत आहे, 'नाचता येईना अंगण वाकडं'. आरं ठिबकसाठी ५०-६० टक्के अनुदान मिळते. गरज असेल तर ठिबकला कर्जही मिळतं. एकदा ठिबक केलं की १०-१५ वर्षे परत बघायला नको. एका एकरला ५०-६० हजार रुपये खर्च येतो. त्यापैकी ३० हजार अनुदान व बाकीचे पैसे आपण घातले की झाले. ठिबकचे फक्त १०

वर्षे आयुष्य धरले तरी एकरी शेतकऱ्याला फक्त ३,००० प्रतिवर्षे एवढा खर्च येतो. आता तूच विचार कर, एका एकराला पाणी द्यायला मजूर लावला तर दिवसाला ४००- ५०० रुपये मजुरी निघून जाते. वर्षातून १५-२० वेळा पाणी दिले तरी एकरी पाच ते सहा हजार रुपये मजुरी पाणी द्यायला लागते. हा विचार तू कधी केलास काय? दुसरे महत्त्वाचे म्हणजे ठिबकने पाणी दिले तर तुला रात्री- अपरात्री जागायची गरज नाही. लाईटची वाट पाहात बाऱ्यावर बसायचीही गरज नाही. बरं पाणी माफक प्रमाणात दिल्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो. जमीन भुसभुशीत राहते. जमिनीमध्ये हवा- पाणी यांचे ५०-५० टक्के अशा प्रकारचे संतुलन राहते. जमिनीत जीव-जिवाणूंची- गांडुळांची चांगली वाढ होते. जमिनीमध्ये पिकाच्या पांढऱ्या मुळांची चांगली वाढ होऊन उत्पादनात वाढ होईल. ठिबकमधून खत देत असल्यामुळे जमिनीत खत टाकायची गरज नाही. त्यामुळे पाण्याचा कार्यक्षम वापर वाढेल. खर्चात बचत होईल. जमिनीत कमी रासायनिक खत टाकल्यामुळे जमिनीची प्रतही सुधारेल. आरं गंपा, ठिबकचा वापर करणे म्हणजे फक्त पाण्याची बचत नाही तर पैशांची बचत, उत्पादनात वाढ, शारीरिक श्रम कमी होणे आणि जमिनीतही सुधारणा यासारख्या अनेक चांगल्या बाबी आहेत. ज्याचा हिशेब आपण कधी करतच नाही बघ. पुढच्या काळात युद्ध होईल ते पाण्यावरून असे म्हटले जाते आहे. पाणी वाचविणे, कमीतकमी पाण्यात पिके घेणे हे आपले सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. खरं तर तो एक महत्त्वाचा प्रश्न आहे. गंपा, तुला जर २४ तास लाईट दिली ना तर तू जमिनीतील पाणी तर संपवशीलच त्याचबरोबर जमिनीचीही वाट लावशील.''

यावर मात्र गणपतने कानाला हात लावला व तो म्हणाला, ''नाही रं संपा, कसं होतं- सोनाराने कान टोचल्याशिवाय फायदा होत नाही असं म्हणतात, आता तूच माझे कान धरशील आणि डोळे उघडशील ना! खरंय तुझं संपा, उगाच साप साप म्हणून भुई धोपटण्यात काय मजा आहे? पाणी खरं तर गरजेपुरतंच दिलं पाहिजे आणि ते तुमच्याकडे किती आहे त्याचा विचार न करता... मी करतो संपा यावर्षीपासून ठिबक करायला सुरुवात. दरवर्षी एक एकर का होईना पण पुढच्या दोन-तीन वर्षांत माझी सर्व जमीन ठिबकखाली आणतो बघ. फार त्रास होतो हे पाणी भरायला. आता कंटाळा येतो पाणी द्यायचा. ठिबक केलं म्हणजे पाणी भरायचा त्रास कमी होईल. खते कशी द्यायची, ठिबक कसे चालवायचे आणि चांगले उत्पादन घेण्यासाठी ठिबकचा चांगला वापर कसा करून घ्यायचा हे सांगायला माझा गुरू संपा आहेच की! चल आज तुला गुरुदक्षिणा म्हणून चांगला स्पेशल चहा पाजतो.''

- यानंतर हसत हसत दोघे हॉटेलकडे निघाले.

**(सौजन्य: पूर्वा कृषिदूत परिवार)**

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**